राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाच्या व्याप्ती या घटकांतर्गत सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप लघुनळ पाणी पुरवठा योजना जिल्हा स्तरावरून राबविताना करण्यात येणाऱ्या ई-निविदा प्रक्रियेत अंशत: सुधारणा करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३२१/पापु-१५**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल इमारत,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.
तारीख: १८ ऑगस्ट, २०१६.

वाचा :-

१) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** ग्रापापु-५३१०/प्र.क्र.०४/पापु-१५, दिनांक ११ जानेवारी, २०१०.
२) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** ग्रापापु-५३१०/प्र.क्र.०४/पापु-१५, दिनांक २९ डिसेंबर, २०११.
३) **शासन शुद्धीपत्रक, समक्रमांकः** दिनांक १७ ऑक्टोबर, २०१० व दिनांक २४ जुलै, २०१५.
४) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक ०९ जुलै, २०१४.
५) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** ग्रापाधो-११११/प्र.क्र.१३४/पापु-०७, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५.
६) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांकः** लपापु-२०१६/प्र.क्र.०६/पापु-१५, दिनांक २१ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना :-

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या व्याप्ती या घटकांतर्गत विंधन विहिरींवरील दुहेरी पंपावर आधारित लघु नळ पाणी पुरवठा योजना राज्यात राबविण्यात येत आहेत. संदर्भ क्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये सदर योजनांची अंमलबजावणी जिल्हास्तरावरून करण्यात येत आहे. जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत ई-निविदांद्वारे कंत्राटदाराकडून कामे करून घेताना सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठी एकत्रित निविदा प्रक्रिया पूर्ण करून कमीत कमी दर असलेल्या एकाच कंत्राटदारास कामे दिली जात असल्याचे निदर्शनास येत

आहे. एकाच कंत्राटदारास कंत्राट दिल्याकारणाने संख्येने जास्त असलेल्या योजनांची कामे आठ आठवड्याच्या मुदतीत पूर्ण करून घेण्यास अडचणी येत असल्याने सध्याच्या ई-निविदा प्रक्रियेत अंशत: बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक :-

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या व्याप्ती या घटकांतर्गत सौर उर्जेवर आधारित दुहेरी लघु नळ पाणी पुरवठा योजना जिल्हा स्तरावरून राबविताना योजनांची कामे विहित वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने यापुढे एकत्रित निविदा प्रकिया पूर्ण करून एकाच कंत्राटदारास कंत्राट देण्याऐवजी निविदांद्वारे प्राप्त कमीत कमी दर निश्चित करून निविदेतील पात्र व इच्छुक कंत्राटदारांचे पॅनेल तयार करण्यात यावे व पॅनेलवरील कंत्राटदारांमार्फत निविदेतील किमान दराने अथवा वाटाघाटीनंतर होणाऱ्या किमान दराने योजनेची कामे करण्यात यावीत, किंवा प्रत्येक कामाची स्वतंत्र ई-निविदा काढण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक 201608181659099528 असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(चेतन निकम)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. विभागीय आयुक्त (सर्व)
४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, शिवाजीनगर, पुणे.
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

७. सह संचालक (अभियांत्रिकी), भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, शिवाजीनगर, पुणे.
८. उप संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
९. मुख्य खोदण अभियंता, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
१०. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
११. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
१२. उप अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उप विभाग/ देखभाल दुरुस्ती कक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
१३. उपसचिव (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (कार्यासन, पापु-१५), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.